सकाळ

Date: 10 February 2010

Edition: Pune

Page No.: 11

# 'आयपीएल'ची उत्कंठा अनुभवा थिएटरमध्ये!

## पुण्यात आयनॉक्ससह विजय, वैभव क्रिकेटप्रेमींसाठी सुविधा

**पुणे, ता. ९ :** ट्वेंटी-२० क्रिकेट स्पर्धेच्या आयपीएल या सर्वाधिक लोकप्रिय स्पर्धेतील सामन्यांची तिकिटे मिळाली नाहीत, म्हणून आता निराश व्हायचे कारण नाही. घरात बसून दूरदर्शनवरून सामने बघताना मध्येच येणाऱ्या जाहिरातींचाही अडथळा नाही. कुठल्याही व्यत्ययाशिवाय आयपीएलच्या सामन्यातील रंगत चित्रपटगृहातून अनुभवायला मिळेल. जगातील सर्वात मोठे डिजिटल सॅटेलाईट सिनेमा नेटवर्क असणाऱ्या 'यूएफओ मूव्हीज'ने ही सुविधा भारतभर उपलब्ध करून दिली आहे. त्यांच्या माध्यमातून आयपीएल सामन्यांचे चित्रपटगृहातून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

क्रिकेट सामन्यांचे थेट प्रक्षेपण चित्रपटगृहांमधून करण्याची ही भारतातील पहिलीच वेळ असून, देशभरात एक हजारहून अधिक मोठ्या पडद्यांवर हे सामने दाखविण्याचे उद्देश असल्याचे 'यूएफओ मूव्हीज'चे मुख्य कामकाज अधिकारी पंकज जयसिंह यांनी सांगितले. या योजनेची अधिक माहिती देताना ते म्हणाले, "आमच्याकडे स्वतःचे सतराशेहून अधिक डिजिटल स्क्रिन्स उपलब्ध आहेत. दूरदर्शनवरून क्रिकेटचे सामने बघताना जाहिरातींचा व्यत्यय येतो. त्यामुळे अनेक वेळा रंगत निघून जाते. त्यामुळे कुठल्याही व्यत्ययाशिवाय क्रिकेटचाहत्यांना सामने बघता यावेत, यासाठी ही योजना आम्ही राबविणार आहोत." पुण्यात ही सुविधा आयनॉक्स, फेम या मल्टिप्लेक्ससह विजय आणि वैभव चित्रपटगृहातून उपलब्ध असेल.

'आयपीएल'च्या २०१० ते २०१९ या हंगामातील सर्व सामन्यांच्या वितरणाचे हक्क असणाऱ्या क्राऊन इन्फोन्मेंट कंपनीच्या सहयोगाने हा उपक्रम राबविला जाईल. यासाठी मल्टिप्लेक्स आणि एकच पडदा असणाऱ्या चित्रपटगृहात चित्रपटांसाठी आकारण्यात येणारा दरच सामन्यांच्या तिकिटांसाठी आकारला जाईल. साहजिकच आयपीएलची लोकप्रियता लक्षात घेता या योजनेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल, अशी आशा व्यक्त करून जयसिंह म्हणाले, "स्पर्धेच्या ४५ दिवसांच्या कालावधीत कुठलाही नवा चित्रपट प्रदर्शित होणार नसला तरी चित्रपटगृहांच्या उत्पन्नात, तसेच सरकारच्या कर संकलनात भरच पडेल. यातून मिळणाऱ्या नफा आणि तोटा यामध्ये चित्रपटगृहे आणि क्राऊन इन्फोन्मेंट यांचा समान वाटा असेल."

### अशी असेल रचना

| | | | |
|---|---|---|---|
| ५५० | २०० | १३२ | ४ |
| देशभरातील चित्रपटगृहांशी करार | मल्टिप्लेक्स चित्रपटगृह | महाराष्ट्रातील चित्रपटगृह | पुण्यातील चित्रपटगृह |